MHOS150016242017

## निशाणी क्र. १ खालील आदेश

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द अभियोजन पक्षाने भा.दं.वि.कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दंडनिय गुन्हयासाठी दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणातील आरोपी मिळुन येत नसल्यामुळे निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यासाठी प्रकरण ठेवण्यात आले. सदर प्रकरणात दिनांक १४.११.२०२५, २८.११.२०२५, ३०.०१.२०२६, १८.०३.२०२६, ०२.०४.२०२६, ०१.०१.२०२६, २८.०१.२०२६, १३.०२.२०२६, ०९.०४.२०२६, १८.०२.२०२६, २३.०२.२०२६, ०२.०३.२०२६, १५.०४.२०२६, २२.०४.२०२६ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोजनपक्षास त्यांचे साक्षीदार हजर ठेवण्यासाठी आदेशित करण्यात आले. परंतु अभियोजनपक्षाने आदेशाचे दखल घेतली नाही व साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवले नाही.

वारंवार संधी देवुन सुध्दा अभियोजनपक्ष साक्षीदार हजर ठेवण्यास अपयशी ठरल्यामुळे व आदेशाची दखल घेत नसल्यामुळे निशाणी क्र. १ वर दिनांक ०७.०५.२०२६ रोजी आदेश पारीत करुन अभियोजनपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. सदर प्रकरणातील

साक्षीदार उपस्थित ठेवुन त्यांचा पुरावा नोंदविण्यास अभियोजनपक्ष अपयशी ठरला आहे. त्यामुळे सदर प्रकरणातील आरोपींविरुध्द कुठलाही पुरावा उपलब्ध नाही. सदर प्रकरणातील आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्या इतपत सबळ पुरावा अभिलेखावर असल्याचे दिसुन येत नाही. सदर प्रकरण हे ०८ वर्षांपेक्षा जास्त जुने असुन प्रलंबीत आहे. प्रकरणात आरोपींविरुध्द आरोप निश्चित करण्या इतपत अभिलेखावर पुरावा आलेला नसल्यामुळे सदर प्रकरण यापुढे प्रलंबीत ठेवणे फलदायी ठरु शकत नाही व आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ दिनेश जगन्नाथ हिंदुळे, आरोपी क्र. २ जगन्नाथ पांडुरंग हिंदुळे, आरोपी क्र. ३ उमेश जगन्नाथ हिंदुळे, आरोपी क्र. ४ कौशल्या जगन्नाथ हिंदुळे यांना भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दंडनिय गुन्हयाच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३९ नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | प्रकरण बंद करण्यात येत आहे. |

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.05.07 17:03:00 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक – ०७.०५.२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग परंडा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.N.Phurade |
| Name of Court | Shri. Dilip G. Jagtap, Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 07/05/2026 |
| Judgment signed by the P.O. on | 07/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | 07/05/2026 |